# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २० नोव्हेंबर २००८ रोजी (कार्यक्रम पत्रिका क्र.१८) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक २०/११/२००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ३.४५ वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त (म.) श्री.उध्दव घुगे नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.सौ.विजयाताई बनकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शकुंतला सांडुजी
२४. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२८. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसूद
२९. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन

३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३३. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३४. स.स.श्री.संजु रिडलॉन
३५. स.स.सौ.विणा सिध्द गजेंद्र
३६. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३७. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३८. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३९. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४०. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४१. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४२. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४३. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४४. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४५. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४६. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४७. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
४८. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४९. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५०. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५१. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
५२. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५४. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५६. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५७. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५८. स.स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
५९. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
६०. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६१. स.स.श्रीमती जयश्री किवळेकर
६२. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६३. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६४. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७३. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
७४. स.स.सौ.जैन अल्पा विकास

७५. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

७६. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर

०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले

०३. स.स.श्री.राजेश व्यास

०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.संतोष खेंडके : ज्या स.सदस्यांचे सभासदत्व रद्य केलेले आहे त्यांना सर्वप्रथम सभागृहाच्या बाहेर काढण्यात यावे.

अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात.

श्री.गजानन बारवाल :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवरून बोलावे.

श्री.संजय जगताप :ज्या सदस्यांचे सभासदत्व रद्य केले ते मागे घ्यावे पिठासीन अधिकारी यांना अशा पध्दतीने सभासदत्व रद्य करता येते का?

मा.महापौर :आधी आपण जागेवर बसा यावर निर्णय होईल. स.सदस्य आपण जागेवर बसा यावर बोलता येईल निर्णय होईल.

श्री.संतोष खेंडके :ज्या सदस्याचे सभासदत्व रद्य करण्यात आले त्यांना सर्वप्रथम बाहेर काढावे.

श्री.गजानन बारवाल :सभासदत्व रद्य करण्यासाठी सांगणे कायदयाने अधिकार नाही.

श्री.संतोष जेजूरकर :सभासदत्व रद्य करा जागेवर बसून करा.

श्री.रविकांत गवळी :सर्व सदस्यांना अगोदर जागेवर बसवावे

श्री.सलीम खान : सकाळपासून या सभागृहात गोंधळ होत आहे ही सभा तहकूब झाली पाहिजे. ठराव विषय क्रमांक न बोलताही ठराव पास होत आहे.सभा तहकूब करावयास पाहिजे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर येवून अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात गोंधळ चालू होतो. काही सदस्य राजदंड उचलण्याचा प्रयत्न करतात.

मा.महापौर :स.सदस्य आपण जागेवर बसा.

श्री.सलीम खान :सभा तहकूब करावयास पाहिजे.

मा.महापौर :स.सदस्य आपण जागेवर बसा.

श्री.संतोष जेजूरकर :यांचे सर्वांचे सभासदत्व रद्य करावे.

श्री.गजानन बारवाल

श्री.गजानन बारवाल :ज्या प्रकारे या सभागृहात जे कुणी गोंधळ घालतात त्यांचे सभासदत्व रद्य करावे.

श्री.संतोष खेंडके :हा काय गोंधळ चालला सर्वांना सभागृहाच्या बाहेर काढण्यात यावे त्यांचे सर्वांचे सभासदत्व रद्य करावे यांना सभागृहाबाहेर काढावे. यांची मनमानी चालली आहे.

श्री.गजानन बारवाल :हा सभागृहाचा अपमान आहे त्यांचे सभासदत्व रद्य करा.

याचवेळी स.स.श्री.नासेर नाहदी स.स.श्री.संजय जगताप श्री.मिलींद दाभाडे हे मा.महापौर यांचे डायस वरील राजदंड उचलतात व तो राजदंड स.सदस्य श्री.नासेर नाहदी हे घेवून जातात. गोंधळ चालूच असतो.

श्री.संतोष खेंडके :सभा चालवा दबावाला बळी पडू नका.

मा.महापौर :ज्या पध्दतीने आताच या सभागृहात जो गोंधळ झालेला आहे.आणि या सभागृहाचा अपमान करणारा असे येथे वागणे होत आहे. कुणी गोंधळ

घालतात यांचेवर प्रशासनाने त्वरेने कार्यवाही करावी आता विषय पत्रिकेला सुरूवात करावी. विषय क्र.३३९

श्री.संतोष खेंडके :विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

**विषय क्र. ३३९ :**

दिनांक ३१.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.सलीम खान :जेंव्हा राजदंड डायसवर नसतो तेंव्हा मा.महापौर यांनी सभा तहकूब करावयास पाहिजे खुर्ची सोंडवयास पाहिजे.जेंव्हा राजदंड उचलला जातो तेंव्हा महापौरांनी खुर्ची सोडावयास पाहिजे असे माझी माहिती आहे.

याचवेळी स.सदस्य श्री.नासेर नाहदी यांचेकडून सुरक्षा विभागाचे कर्मचारी राजंदड घेवून डायसवर ठेवतात.यावेळी डायस समोर अनेक स.सदस्य उभे असतात गोंधळ चालू असतो मोठमोठयाने बोलतात गोंधळ चालू असतो.

मा.महापौर :स.सदस्यांना मी वारंवार सुचना करते की आपण जागेवर बसा या पध्दतीने वागण्याचा अधिकार आपल्याला नाही.

याचवेळी स.सदस्य श्री.नासेर नाहदी हे इतर ही आघाडीचे काही सदस्य मा.महापौर डायसवरील राजदंड उचलतात व स.सदस्य श्री.नासेर नाहदी हे घेवून जातात. या गोंधळातच मा.महापौर डायस वरील माईक पडतो मा.महापौर सर्वांना जागेवर बसण्याची सुचना देतात. स.सदस्य यांचे मोठमोठयाने बोलणे चालू असते पक्षपात करणाऱ्या महापौराचा धिक्कार असो अशा स.सदस्य घोषणा देतात गोंधळ चालू असतो.

श्री.संतोष खेंडके :सभा चालवा त्यांना आपण घाबरू नका स.सदस्यांना खाली बसा.

मा.महापौर : विषय पत्रिकेला घेण्यात येते.३३९ विषयावर बोलावे.

श्री.संतोष खेंडके :मंजूर करावा.

याचवेळी मा.महापौर विषयपत्रिकेला सुरूवात करतात.स.सदस्यांचा डायस समोर गोंधळ चालूच असतो काही सदस्य श्री.नासेद नाहदी यांचे सभासदत्व रद्द करण्याची मागणी करतात.

याचवेळी इतर काही सदस्य विषय मंजूर सर्व विषय मंजूर करावे अशा मोठमोठयाने बोलतात. मोठमोठयाने बोलण्याचा गोंधळ चालूच असतो.

मा.महापौर :विषय पत्रिकेवरील विषय,पुरवणी विषय ऐनवेळच्या विषयासह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ३१.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**प्रशासकीय प्रस्ताव**

**विषय क्र. ३४० :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिका हद्दीतील सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व विकसीत करण्याचा महानगरपालिकेचा प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पाच्या विकासासाठी पहिला टप्प्यात रूपये ५.०० कोटीचा प्रस्ताव असुन त्यापैकी महाराष्ट्र शासनाकडून ५०% चा सहभाग म्हणजेच रूपये २.५० कोटी एवढा निधी उपलब्ध होणे अपेक्षीत आहे. व त्यामधुन रूपये १.०० कोटी महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत आणि महानगरपालिकेच्या हिश्यातील रकमेसाठी सन२००८-०९या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पातील जलव्यापक क्षेत्रातील गाळ उपसुन साठलेल्या जलसाठयाचे शास्त्रोक्त पध्दतीने जल शुध्दीकरण करून प्रकल्प विकासासाठीची पुढे नमुद कामे हाती घ्यावयाची आहे. सदर प्रकल्पाचे सभोवतालची परिमिती क्षेत्रात आदमासे २.०० कि.मी. लांबीच्या पाथवे बांधणे, सदर

ठिकाणी स्थलांतरीत येणाऱ्या विविध प्रजातींच्या पक्षांची संख्या बरीच मोठी आहे. पक्षी निरीक्षणासाठी अस्तित्वातील मनोरा वापरात घेऊन पक्षी निरीक्षकांसाठी सुविधा निर्माण करणे, सदर प्रकल्पास भेट देणाऱ्या नागरीकांच्या सुविधे दृष्टीने फुड प्लाझा,लहान मुलांसाठी मनोरंजन केंद्र,बोटींग प्लेटफार्म, वाहनांसाठी पार्कींग व्यवस्था आणि सुशोभिकरणाच्या दृष्टीने लँडस्केपींग करणे इत्यादी सुविधाव्दारे प्रकल्प विकासाची कामे हाती घ्यावयाची आहे.

करीता सलीम अली सरोवर विकसीत करणेचा प्रस्ताव/अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील सलीम अली सरोवर सौंदर्यीकरण व सदर प्रकल्पाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाकडून ५०% चा सहभाग म्हणजेच रूपये २.५० कोटी एवढा निधी उपलब्ध होणार असल्यामूळे, पहिल्या टप्प्याच्या र.रू.५.०० कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र .५२, एम.जी.एम. ते गंजेशहीदा चौक उर्वरित रस्त्याचे कॉंक्रीट पेवमेंट बांधणी करणे करीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००७-२००८ यावर्षीच्या दरसूचि नुसार रक्कम रूपये ३०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. या कामाचा खर्च सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात स्लम भागात नविन कॉंक्रीट रस्ते बांधणे या लेखाशिर्षा मधून करण्यात येत आहे.

करीता रक्कम रूपये ३०,००,०००/-च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.५२, एम.जी.एम.ते गंजेशहीदा चौक उर्वरित रस्त्याचे कॉंक्रीट पेवमेंट बांधणी करणेच्या रक्कम रूपये ३०,००,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शताब्दीनगर येथील मा.पोलीस अधिक्षक (ग्रामीण) यांच्या कार्यालयाजवळील मैदानालगत असलेल्या संरक्षित भिंतीची दुरूस्ती व वाढ करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.५,९०,६८६/- सन२००७-०८ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामासाठी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध नसल्यामूळे व काम करणे आवश्यक असल्याने सदरील काम याच अर्थसंकल्पीय पुस्तीकातील पान क्र.डब्ल्यु-३ व अ.क्र.९ वर असलेले बाबा पेट्रोल पंप येथे बसस्थानक बांधणेच्या कामासाठी उपलब्ध असलेली तरतूद रक्कम रू.६.५५ लक्ष सदरील काम हे जागेअभावी रद्द करण्यात आल्यामूळे सदरील कामाच्या तरतूदीमधून प्रस्तावित काम करणे आवश्यक असल्याने लेखाशिर्ष बदलणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदरील कामासाठी अर्थसंकल्पात नमूद पान क्र.डब्ल्यु-३,अ.क्र.९ वरील रक्कम रू.६.५५ लक्ष निधी प्रस्तावित कामासाठी शिर्ष बदलणेचा प्रस्तावाचा मसुदा मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शताब्दीनगर येथील मा.पोलीस अधिक्षक (ग्रामीण) यांच्या कार्यालयाजवळील मैदानालगत असलेल्या संरक्षित भिंतीची दुरूस्ती व वाढ करणे या कामाचे रक्कम रू.५,९०,६८६/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरील कामासाठी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध नसल्यामूळे व काम करणे आवश्यक असल्याने सदरील काम याच अर्थसंकल्पीय पुस्तीकातील पान क्र.डब्ल्यु-३ व अ.क्र.९ वर असलेले बाबा पेट्रोल पंप येथे बसस्थानक

बांधणेच्या कामासाठी उपलब्ध असलेली तरतूद रक्कम रू.६.५५ लक्ष सदरील काम हे जागेअभावी रद्द करण्यात आल्यामूळे सदरील कामाच्या तरतूदीमधून करणेस व लेखाशिर्ष बदलणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ३४३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्र.२ मधील प्रथमेश हौसींग सोसायटी येथील खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे करीता ४.९० लक्ष रू. अ.क्र.१६ पान नं.डब्ल्यू-११२ वर तरतुद करण्यात आलेली आहे.

तसेच पान क्र.१११ अ.क्र.११ वर प्रभाग क्र.२ मधील शिवगीरी हौसींग सोसायटी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेसाठी र.रू.४.७० लक्ष तरतुद केलेली असून उपरोक्त दोन्ही कामाऐवजी प्रभाग क्र.२ मध्ये विविध ठिकाणी पोलसहीत लाईट लावणेसाठी एकुण र.रू.०९.६० लक्ष रूपये वळती करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सिताराम इसराम सुरे अनुमोदक : श्री.प्रकाश अत्तरदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्र.२ मधील प्रथमेश हौसींग सोसायटी येथील खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे करीता अ.क्र.१६ पान नं.डब्ल्यू-११२ वर असलेली र.रू.४.९० लक्ष तरतुद तसेच पान क्र.१११ अ.क्र.११ वर प्रभाग क्र.२ मधील शिवगीरी हौसींग सोसायटी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेसाठी असलेली र.रू.४.७० लक्ष तरतुद या दोन्ही कामाऐवजी प्रभाग क्र.२ मध्ये विविध ठिकाणी पोलसहीत लाईट लावणेसाठी एकुण र.रू.०९.६० लक्ष रूपये वळती करणेस व लेखाशिर्ष बदलणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,महानगरपालिका अस्थापनेवर सन १९९४ पासुन श्री.प्रशांत प्रभाकर शहापुरकर हे कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत आहेत. त्यांची शैक्षणिक अर्हता बी.एस्सी. (रसायनशास्त्र) असुन त्यांची अन्न निरीक्षक पदासाठीच्या प्रशिक्षणासाठी ते पात्र असल्यामुळे त्यांना प्रशिक्षणास पाठविण्यास तत्कालीन मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तसेच महानगरपालिका प्रशासनातर्फे घेण्यात आलेल्या अन्न निरीक्षक पद भरतीवेळी त्यांनी देखिल परिक्षा दिली होती व त्यात ते पास झालेले होते. त्यांची शैक्षणिक पात्रता व महापालिकेतील प्रदिर्घ सेवा आणि महापालिकेची आर्थिक परीस्थिती विचारात घेता आणि महापालिकेत नविन सहा अन्न निरीक्षक पद भरण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली असल्याने शासनाची सदर पदास मंजुरी मिळेल हया अधिन राहुन त्यांची नियुक्ती अन्न निरीक्षक पदावर केल्यास महापालिकेवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही.

करीता श्री.प्रशांत प्रभाकर शहापुरकर (क.लिपीक)यांची अन्न निरीक्षक पदावर नियुक्ती करणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.भाऊसाहेब वाघ, सौ.लता दलाल, श्री.अशरफ मोतीवाला

अनुमोदक : श्री.गजानन बारवाल, श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अस्थापनेवर सन १९९४ पासुन श्री.प्रशांत प्रभाकर शहापुरकर हे कनिष्ठ लिपिक पदावर कार्यरत आहेत. त्यांची शैक्षणिक अर्हता बी.एस्सी. (रसायनशास्त्र) असुन त्यांची अन्न निरीक्षक पदासाठीच्या प्रशिक्षणासाठी ते पात्र असल्यामुळे त्यांना प्रशिक्षणास पाठविण्यास तत्कालीन मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता व महापालिकेतील प्रदिर्घ सेवा विचारात घेता आणि महापालिकेत नविन सहा अन्न निरीक्षक पद भरण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली असल्याने शासनाची सदर पदास मंजुरी मिळेल हया

अधिन राहुन त्यांची नियुक्ती अन्न निरीक्षक पदावर करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भिमनगर,भावसिंगपुरा येथील ओळखला जाणारा वाल्मीकी चौक या नावाने त्या भागात हा चौक प्रसिध्द आहे व त्या चौकात त्या भागातील वाल्मीकी समाजाचे व अन्य सर्व कार्यकर्ते या चौकामध्ये खुप वर्षा पासून कार्यक्रम घेत असतात. सदरील चौकामध्ये सर्व कार्यकर्ते व नागरीक सर्व मिळून गणेशोत्सव वाल्मीकी जयंती,नवरात्रोत्सव इ. उत्सव साजरे करतात. तसेच अनेक वर्षापासून तो चौक नागरीकांनी वाल्मीकी चौक म्हणून प्रसिध्द केलेला आहे. परंतु आजपर्यंत त्या चौकाचे वैधानिक स्वरूपात नामकरण महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेले नाही. त्या भागातील नागरीकांची माझ्या माध्यमातून विनंती करण्यात येत आहे की त्या चौकाचे नामकरण करून सदरील चौकात महानगरपालिकेतर्फे नामफलक लावण्यात येऊन वैधानिक रित्या त्याचे नोंदणी करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीव रिडलॉन अनुमोदक :श्री.भगवान घडमोडे, श्री.मिलींद दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर,भावसिंगपुरा येथील चौकाचे वाल्मीकी चौक असे नामकरण करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.महापौरांचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या सौ.शैलजा गुळवे (कुडचे) हया लिपीक संवर्गातील आहे व त्या गेल्या १० वर्षापासून हे पद सांभाळत आहेत. तसेच स्वीय सहाय्यक पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता त्यांच्याकडे आहे. त्या हे पद सक्षमरित्या सांभाळीत आहेत. परंतु त्यांना पदासाठीची वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. तरी त्यांना स्वीय सहाय्यक/लघुलेखक संवर्गातील वेतनश्रेणी देण्यात यावी किमान त्यांना कार्यालयीन अधीक्षक संवर्गातील वेतनश्रेणी रू.५५००-१७५-९००० ही विशेष बाब म्हणून प्रदान करण्यात यावी. याबाबत दिनांक २०.०१.२००४ रोजीच्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक २६४/०६ अन्वये ठराव मंजुर झालेला आहे. परंतु सदरील ठरावाची अंमलबजावणी आतापर्यंत झालेली नाही.

करीता उपरोक्त प्रस्तावाची त्वरीत अंमलबजावणी व्हावी व सौ.शैलजा गुळवे यांना कार्यालयीन अधिक्षक संवर्गातील वेतनश्रेणी रू.५५००-१७५-९००० ही विशेष बाब म्हणून प्रदान करण्यात येऊन श्रेणीवाढ करण्यात यावी. त्यांचे सध्याचे वेतन रू.६२५०/- असल्याने त्यांना कार्यालयीन अधिक्षक संवर्गातील वेतनश्रेणी देण्यात येऊन श्रेणीवाढ केल्यास, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर काहीही अतिरीक्त आर्थिक बोजा पडणार नाही.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.डॉ.भागवत कराड

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार, श्री.अशरफ मोतीवाला
श्री.गजानन बारवाल, श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.महापौरांचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या सौ.शैलजा गुळवे (कुडचे) हया लिपीक संवर्गातील आहे व त्या गेल्या १० वर्षापासून हे पद सांभाळत असल्यामूळे, त्यांना कार्यालयीन अधिक्षक संवर्गातील वेतनश्रेणी रू.५५००-१७५-९००० ही विशेष बाब म्हणून प्रदान करण्यात येऊन श्रेणीवाढ करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२ मधील सर्वे नं.१८८,१८२,१२७,१५१,१५२,१९४ या भागातील गुंठेवारी अंतर्गत जमा झालेली रक्कम अंदाजे आठ लक्ष पन्नास हजार (८,५०,०००/-

फक्त) ही राजे संभाजी कॉलनीमध्ये रस्ता तयार करण्यासाठी वळती करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सिताराम सुरे अनुमोदक : श्री.प्रकाश अत्तरदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२ मधील सर्वे नं.१८८,१८२,१२७,१५१,१५२,१९४ या भागातील गुंठेवारी अंतर्गत जमा झालेली रक्कम अंदाजे आठ लक्ष पन्नास हजार(८,५०,०००/-फक्त)ही राजे संभाजी कॉलनी मध्ये रस्ता तयार करण्यासाठी वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७० येथील (०१) इंद्रप्रस्थ येथील खुली जागा विकसीत करणे तरतुद रू.२.०० लक्ष पान क्र.१५५/१२ (०२) नंदीग्राम सोसायटी येथील खुली जागा विकसीत करणे तरतुद ३.०० लक्ष पान नं.१५५/१५ ऐवजी स्वप्न नगरी येथे डांबर रोड करण्यासाठी वरील एकुण ५.०० लक्ष वळती करावे ही नम्र विनंती.

सुचक : श्री.विजय किसनराव खुडे अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७० येथील (०१) इंद्रप्रस्थ येथील खुली जागा विकसीत करणे तरतुद रू.२.०० लक्ष पान क्र.१५५/१२ (०२) नंदीग्राम सोसायटी येथील खुली जागा विकसीत करणे तरतुद ३.०० लक्ष पान नं.१५५/१५ **याऐवजी** स्वप्ननगरी येथे डांबर रोड करण्यासाठी वरील एकुण ५.०० लक्ष वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६१ समर्थनगर म.न.पा.च्या समर्थनगर मधील मैदानाचे बजरंग व्यायाम शाळा हे नांव बदलुन मुक्ती संग्राम स्मृती उद्यान हे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.कला बोरामणीकर, श्री.गजानन बारवाल अनुमोदक : सौ.लता दलाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६१ समर्थनगर येथील महापालिकेच्या मैदानाचे बजरंग व्यायाम शाळा हे नांव बदलुन मुक्ती संग्राम स्मृती उद्यान हे नांव देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३५० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या बन्सीलाल नगर येथील सिटीजन्स स्पोर्ट सेंटर भगवान महावीर सांस्कृतिक हॉलच्या तळमजल्यातील हॉल अध्यक्ष संत रोहिदास महाराज क्रिडा मंडळ सोनार गल्ली,पदमपुरा या संस्थेने भाडे तत्वावर देण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे. सदरील हॉल देखरेखीच्या उद्देशाने भाडे तत्वावर देण्यासाठी कल्पना हौ.सो. व बन्सीलाल नगर येथील नागरीकांनी नाहरकत दिलेली आहे. तसेच मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून सदरील हॉल संस्थेस भाडे तत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल, सौ.अल्पा विकास जैन

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या बन्सीलालनगर येथील सिटीजन्स स्पोर्ट सेंटर भगवान महावीर सांस्कृतिक हॉलच्या तळमजल्यातील हॉल अध्यक्ष संत रोहिदास महाराज क्रिडा

मंडळ सोनार गल्ली,पदमपुरा या संस्थेस नियमाप्रमाणे भाडे तत्वावर देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.९४ कल्पना हौ.सो. बन्सीलाल नगर मनपाची मोकळी जागा व हॉल श्री.स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित नोंदणी कृत संस्था शाखा क्र.५ यांना नाममात्र दरात भाडे तत्वावर कायमस्वरूपी देण्यात यावे. सदरील संस्थेव्दारे बन्सीलाल नगर मध्ये लोकजागृती व मुलांवर सुस्कंराचे कार्य नियमित सुरू आहे.

करीता बन्सीलाल नगर प्रभाग क्र.९४ मनपाची मोकळी जागा श्री.स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित नोंदणीकृत संस्था शाखा क्र.५ यांना नाममात्र दरात भाडे तत्वावर देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल, सौ.लता दलाल, सौ.अल्पा जैन, श्री.विनोद सोनवणे

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, सौ.अनिता घोडेले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९४ कल्पना हौ.सो. बन्सीलालनगर येथील महापालिकेची मोकळी जागा व हॉल श्री.स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित नोंदणी कृत संस्था शाखा क्र.५ यांना नाममात्र दरात नियमाप्रमाणे भाडे तत्वावर कायमस्वरूपी देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मंजीतनगर परीसरातून कैलास नगर स्मशानभूमीला जाण्यासाठी थेट रस्ता असावा यासाठी दिनांक २६.१०.२००७ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव घेण्यात आला पण वरील ठरावात सदरील रस्ता हा कैलास नगर एमजीएम रोडला जोडावा अशी मागणी कैलास नगर,बायजीपुरा,संजय नगर,भवानी नगर,अहिंसा नगर व इतर परिसरातील नागरीकांची मागणी आहे.

सदरील रस्ता हा मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी सिटी सर्वे नं.१२४८९/१/२ या मालकी हक्केच्या जागेतून सुमारे १४१ स्क्वेअर मीटर व कैलास नगर स्मशान भूमीतील ८३ स्क्वेअर मीटर व मुख्य रस्ता जोडण्यासाठी सिटी सर्वे नं.१२४८७ मधून जागा जात आहे. नागरीकांच्या मागणीनुसार मंजीतनगर भागातून स्मशानभूमीच्या मुख्य गेट पर्यंत जाणेसाठी व कैलास नगर ते एमजीएम या मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी वरील जागेतून रस्ता तयार करावा त्याकरीता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक :श्री.कैलास गायकवाड, सौ.सरला पोळ,श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजीतनगर भागातून स्मशानभूमीच्या मुख्य गेट पर्यंत जाणेसाठी व कैलास नगर ते एमजीएम या मुख्य रस्त्यास जोडण्यासाठी सिटी सर्वे नं.१२४८९/१/२ या मालकी हक्केच्या जागेतून सुमारे १४१ स्क्वेअर मीटर व कैलास नगर स्मशान भूमीतील ८३ स्क्वेअर मीटर व सिटी सर्वे नं.१२४८७ मधून रस्ता तयार करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, क्रांतीचौक जालना रोडवरील महानगरपालिकेचे प्रभाग ड चे कार्यालय रस्ता रूंदीकरणात बाधीत होत असल्याने सदरील कार्यालय कोटला कॉलनी येथील पाण्याच्या टाकीजवळील जागेत स्थलांतरीत करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक जालना रोडवरील महानगरपालिकेचे प्रभाग ड चे कार्यालय रस्ता रूंदीकरणात बाधीत होत असल्याने सदरील कार्यालय कोटला कॉलनी येथील पाण्याच्या टाकीजवळील जागेत स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरात दरवर्षी आंतरराष्ट्रीय किर्तीचे डॉ.शरद कुमार दिक्षीत यांचे लायन्स क्लब या सामाजिक संघटनेसाठी मोठया प्रमाणावर प्लास्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करण्यात येते. मराठवाडयातील गोरगरीब जनतेला याचा मोठया प्रमाणात फायदा होतो. अपघात नैसर्गिक इत्यादी कारणामुळे निर्माण झालेले व्यंग दुर करून सामान्य माणसाच्या जिवनात आनंदाचा क्षण निर्माण करणारे डॉ.दिक्षीत हे जणू मानवता यज्ञच करत असतात.

महानगरपालिकेचे सामाजिक कार्यात नेहमीच योगदान राहत आलेले आहे. या दृष्टिकोनातून लायन्स क्लब मार्फत आयोजीत डॉ.शरदकुमार दिक्षित यांच्या प्लॅस्टिक सर्जरी शिबीराला महानगरपालिकेमार्फत र.रू.१,५०,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख पन्नास हजार फक्त) रूपयांची मदत करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड अनुमोदक : श्री.गजानन बारवाल,श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लायन्स क्लब मार्फत आयोजीत डॉ.शरदकुमार दिक्षित यांच्या प्लॅस्टिक सर्जरी शिबीराला महानगरपालिकेमार्फत र.रू.१,५०,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख पन्नास हजार फक्त) रूपयांची मदत करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एस.एस.सी.बोर्ड ते वन विभाग कार्यालया समोरील चौकास शालीग्रामजी बसैय्ये चौक असे नांव देण्यात यावे, अशी या भागातील नागरीकांची मागणी आहे.

करीता एस.एस.सी.बोर्ड ते वन विभाग कार्यालया समोरील चौकास शालीग्रामजी बसैय्ये चौक असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.डॉ.भागवत कराड अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस.एस.सी.बोर्ड ते वन विभाग कार्यालया समोरील चौकास शालीग्रामजी बसैय्ये चौक असे नांव देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३५७ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००८-२००९ या वर्षाकरीता औरंगाबाद शहरातील प्रभाग अ ते फ मधिल पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता वेगवेगळे अंदाजपत्रक सन २००७-२००८ च्या सर्वात कमी दराच्या मंजुर निविदा दरानुसार तयार करण्यात आले असून सदरचा खर्च विद्युत देखभाल व दरूस्ती या लेखा शिर्षकातून करण्यांत येणार आहे. सन २००८-०९ च्या सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करून देण्याच्या अधिन राहून मान्यता प्राप्त झालेली आहे.

**करीता प्रभाग अ ते फ चे अंदाजपत्रक खालील प्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभाग अ मधिल पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रू.२७,०२,८००/- |
| २. | प्रभाग ब मधिल पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रू.२५,२६,५१०/- |
| ३. | प्रभाग क मधिल पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रू.२१,८६,२५०/- |
| ४. | प्रभाग ड मधिल पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रू.२४,९०,५५०/- |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रभाग इ मधिल पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रू.२०,४०,४००/- |
| ६. | प्रभाग फ मधिल पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रू.१६,३०,४००/- |

----------------

**एकूण रू.१,३५,७६,९१०/-**

----------------

करीता पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करण्याच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००८-०९ या वर्षाकरीता औरंगाबाद शहरातील प्रभाग अ ते फ मधिल पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ६ प्रमाणेच्या एकूण र.रू.१,३५,७६,९१०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरचा खर्च विद्युत देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकातून करण्यांस मान्यता देण्यांत येते, त्याचप्रमाणे विद्युत विभागातर्फे विनंती केल्यानुसार देखभाल दुरूस्तीचे हे काम अधिक परिणामकारक व चांगले होण्याकरीता वार्षीक निविदेद्वारे हे काम न करता त्रैवार्षिक निविदा कालावधीसाठी हे काम करण्यात यावे. त्यामूळे वर दर्शविल्यानुसार १,३५,७६,९१०/- रू. प्रतिवर्षाप्रमाणे तीन वर्षाच्या खर्चास मान्यता देण्यात येते. निविदा काढल्यानंतर आलेल्या निविदा दराप्रमाणे त्या त्या वर्षी अर्थसंकल्पात तशी तरतूद करण्यांत यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८ :**

मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.१२.२००७ च्या ठराव क्रमांक ४३ अन्वये शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत (आय.सी.डी.एस.) बालवाडी मध्ये विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती ४० असेल तर अशा बालवाडी शिक्षिकांना १८००/-रू.प्रतिमाह मानधन व सेविकांना ९००/- रूपये प्रतिमाह मानधन दिले जाते. याप्रमाणेच मानधन देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात आलेली आहे.

परंतु महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांनी विनंती केली आहे की, १९९२ पासून आम्ही बालवाडी शिक्षिका म्हणून मनोभावे कार्य करत असून आतापर्यंत आम्हाला कोणत्याही प्रकारचा फायदा देण्यात आलेला नाही.

करिता बालवाडी वर्गातील विद्यार्थी संख्येच्या कोणताही निकष न लावता सर्वांना १२००/- रूपये प्रतिमाह ऐवजी १८००/- रूपये प्रतिमाह मानधन व बालवाडी सेविकांना ८००/- रूपये ऐवजी ९००/- रूपये मानधन देण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.१२.२००७ च्या ठराव क्रमांक ४३ अन्वये शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत (आय.सी.डी.एस.) बालवाडी मध्ये विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती ४० असेल तर अशा बालवाडी शिक्षिकांना १८००/- रूपये प्रतिमाह मानधन व सेविकांना ९००/- रूपये प्रतिमाह मानधन दिले जाते. याप्रमाणेच मानधन देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतु महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांनी विनंती केल्यामूळे, बालवाडी वर्गातील विद्यार्थी संख्येचा कोणताही निकष न लावता सर्वांना १२००/- रूपये प्रतिमाह ऐवजी १८००/- रूपये प्रतिमाह मानधन व बालवाडी सेविकांना ८००/- रूपये ऐवजी ९००/- रूपये मानधन देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५९ :**

सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करण्यात येतो की, मा.नगरसेविका अजरा जबीन मसुद खान वार्ड क्रमांक २७ यांनी दिनांक २२.०९.२००८ लेखाशिर्ष बदलाबाबत पत्र दिलेले आहे. लेखाशिर्ष बदलास दिनांक २९.१०.०८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मागणीनुसार वार्ड कार्यालयातर्फे.

१. वार्ड क्र.२७ शताब्दीनगर येथील गल्ली नंबर १,२,३ व ४ मध्ये ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे रक्कम रूपये १.५० लक्ष पान क्रमांक डब्ल्यु (W) -१३४ अनुक्रमांक ३८.
२. प्र.क्र.२७ येथील छोटु किराणा स्टोअर्स ते १०० फुट डी.पी.रोड पयत ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रूपये १.०० लक्ष पान क्रमांक डब्ल्यु (W) -१३४ अनुक्रमांक ३९.
३. प्र.क्र.२७ येथील पोलीस मेस समोरील तीन गल्ल्यामधील ड्रेनेज लाईन दुरूस्ती र.रू.१.०० लक्ष पान क्रमांक डब्ल्यु (w) - १३४ अनुक्रमांक ४०.

या कामाऐवजी लेखाशिर्ष बदल करून

वॉर्ड क्रमांक २७ शताब्दीनगर येथे एकूण रक्कम ३.५० लक्ष रूपये विविध ठिकाणी कॉक्रेटींग करणे/ दुरूस्ती करणे,पेव्हर ब्लॉक बसविणे / दुरूस्ती करणे, संरक्षित भिंत बांधणे /दुरूस्ती करणे, मुरूम,मातीकच टाकणे, जलनि:सारण वाहिनी टाकणे,दुरूस्ती करणे,फरशी दुरूस्ती करणे इत्यादी फुटकळ कामे करणे (रक्कम रूपये ३०००/- ते २५०००/- पर्यंत) साठी वार्ड कार्यालय **क** जाफरगेट येथे वळती करणे.

उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक २७ करीता अर्थसंकल्पात प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ प्रमाणे असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे कामे करण्याकरीता लेखाशिर्ष बदलणेस मान्यता देण्यांत येते.

वॉर्ड क्रमांक २७ शताब्दीनगर येथे एकूण रक्कम ३.५० लक्ष रूपये विविध ठिकाणी कॉक्रेटींग करणे/ दुरूस्ती करणे,पेव्हर ब्लॉक बसविणे / दुरूस्ती करणे, संरक्षित भिंत बांधणे /दुरूस्ती करणे, मुरूम,मातीकच टाकणे, जलनि:सारण वाहिनी टाकणे,दुरूस्ती करणे,फरशी दुरूस्ती करणे इत्यादी फुटकळ कामे करणे (रक्कम रूपये ३०००/- ते २५०००/- पर्यंत) साठी वार्ड कार्यालय **क** जाफरगेट येथे वळती करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३६० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, चिकलठाणा एम.आय.डी.सी. मधील अस्तित्वातील 70/150/250w HPSV street light fittings काढून त्या जागी Energy saving फिक्चर्स लावण्याचे काम डिफर पेमेंट तत्वावर दहा वर्षासाठी देण्यात आलेले आहे. सदरचे काम सर्वसाधारण सभा दिनांक २०.०२.२००७ मधील ठराव क्रमांक ७१०, त्याचप्रमाणे स्थायी समिती सभा दिनांक १७.०७.२००७ मधील ठराव क्रमांक ७० नुसार मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती यांना देण्यांत आलेले आहे. याकामी दरवर्षी कंत्राटदारास वर्षाकाठी रूपये २८.२० लक्षचे देयक अदा केले जाते. या देयकापोटी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात रूपये ३०.०० लक्षची तरतूद करण्यसाठी या विभागातर्फे शिफारस केली होती. मा.स्थायी समिती सभेने मान्य केलेल्या अर्थसंकल्पीय पुस्तीकेत याची नोंद (पृष्ठ क्रमांक डब्ल्यु २४) सुध्दा झालेली आहे. परंतू अनावधाने मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर अंतिम केलेल्या अर्थसंक्ल्पीय पुस्तीकेत याची नोंद आलेली नाही.

सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु ३५ वर औरंगाबाद शहरातील उद्यानात विद्युतीकरण करणे या लेखाशिर्ष खाली रूपये ३३.०० ची तरतूद करण्यात आलेली आहे. तरी या तरतूदीपैकी रक्कम रूपये ३०.०० लक्ष तरतूद वरील कामाचा खर्च भागविण्यासाठी वळती करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी. मधील अस्तित्वातील 70/150/250w HPSV street light fittings काढून त्या जागी Energy saving फिक्चर्स लावण्याचे काम डिफर पेमेंट तत्वावर दहा वर्षासाठी देण्यात आलेले असल्यामूळे,सदरचे काम सर्वसाधारण सभा दिनांक २०.०२.२००७ मधील ठराव क्रमांक ७१०, त्याचप्रमाणे स्थायी समिती सभा

दिनांक १७.०७.२००७ मधील ठराव क्रमांक ७० नुसार मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स, अमरावती यांना देण्यांत आलेले आहे. याकामी दरवर्षी कंत्राटदारास वर्षाकाठी रूपये २८.२० लक्षचे देयक अदा केले जाते. या देयकापोटी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात रूपये ३०.०० लक्षची तरतूद करण्यासाठी या विभागातर्फे शिफारस केली होती. मा.स्थायी समिती सभेने मान्य केलेल्या अर्थसंकल्पीय पुस्तीकेत याची नोंद (पृष्ठ क्रमांक डब्ल्यु २४) सुध्दा झालेली आहे. परंतू अनावधाने मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर अंतिम केलेल्या अर्थसंक्ल्पीय पुस्तीकेत याची नोंद आलेली नसल्यामूळे, सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु ३५ वर औरंगाबाद शहरातील उद्यानात विद्युतीकरण करणे या लेखाशिर्ष खाली रूपये ३३.०० ची तरतूद करण्यात आलेली असल्यामूळे. या तरतूदीपैकी रक्कम रूपये ३०.०० लक्ष तरतूद वरील कामाचा खर्च भागविण्यासाठी वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.९९ शिवाजीनगर वार्डात फुटकळ कामासाठी निधी नसल्यामूळे याठिकाणी नागरीकांच्या खूप समस्या आहेत. करीता एकत्रित १० लक्ष रू.मधून १ (एक) लाख रू. फुटकळ कामासाठी वळती करून द्यावेत, करिता हा प्रस्ताव देत आहे.

सुचक : श्री.गजानन बारवाल अनुमोदक : श्री.विनोद सोनवणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९९ शिवाजीनगर वार्डात फुटकळ कामासाठी निधी नसल्यामूळे, एकत्रित र.रू.१० लक्ष मधून र.रू.१.०० (एक) लाख फुटकळ कामासाठी वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६४ मधील मनपा अर्थसंकल्प २००८-०९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यांत यावे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | आर्थिक तरतूद | जूने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| २० डब्ल्यु ६१ | १० लक्ष रूपये | शलाका अपार्टमेंट ते एस.बी.एच. कॉलनी पर्यंत नाला चॅनलिंग करणे. | शलाका अपार्टमेंट जवळील नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे. या कामासाठी ०२ लक्ष रूपये वळती करणे |

सुचक : श्री.राजु वैद्य अनुमोदक : श्री.रवि गांगे,श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६४ मधील मनपा अर्थसंकल्प २००८-०९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यांस मान्यता देण्यांत येते.

| अ.क्र. | आर्थिक तरतूद | जूने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| २० डब्ल्यु ६१ | १० लक्ष रूपये | शलाका अपार्टमेंट ते एस.बी.एच. कॉलनी पर्यंत नाला चॅनलिंग करणे. | शलाका अपार्टमेंट जवळील नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे. या कामासाठी ०२ लक्ष रूपये वळती करणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराचे दिवंगत माजी आमदार स्वर्गीय अमानुल्ला मोतीवाला यांच्या स्मृती प्रित्यर्थ हर्सुल टी-पॉईट या चौकास **स्व.अमानुल्ला मोतीवाला चौक** असे नांव देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्री.किशोर तुलशीबागवाले

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराचे दिवंगत माजी आमदार स्वर्गीय अमानुल्ला मोतीवाला यांच्या स्मृती प्रित्यर्थ हर्सुल टी-पॉईट या चौकास स्व.अमानुल्ला मोतीवाला चौक असे नांव देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३६४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्रमांक २१ अंतर्गत मिसरवाडी येथील लोक वसाहती मधील नागरीकांना सुविधा नसल्याने येणाऱ्या व जाणाऱ्या नागरीकांना फार त्रास होत असुन रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडलेले असून व त्यामध्ये दुर्गंधीयुक्त पाणी साचत आहे. व डास किटाणुंमुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. तरी या वसाहतीमध्ये खडी रस्ता तयार करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्र.क्र.२१, मिसारवाडी हा वार्ड राखीव असुन या वार्डामध्ये ५०% पेक्षा जास्त दलित नागरीक राहत आहेत. या वार्डात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून रूपये २०.०० लक्ष (अक्षरी रूपये वीस लक्ष फक्त) एवढया अंदाजपत्रकात हे काम त्वरीत करण्यात यावे.

सुचक : सौ.शकुंतलाताई इंगळे    अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२१ मिसारवाडी या वार्डात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी र.रू. २०.०० लक्ष एवढया रकमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३६५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वच मराठा समाजाचा सरसगट ओ.बी.सी.प्रवर्गात समावेश करण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : १.श्री.गजानन बारवाल,२.श्री.भाऊसाहेब वाघ,३.डॉ.भागवत कराड,४.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर, ५.श्री.बाबासाहेब डांगे,६.श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : १.श्री.सतिष कटकटे,२.श्री.रवि गांगे,३.श्री.संतोष खेंडके,४.श्री.विजय खुडे, ५.श्री.प्रकाश अत्तारदे,६.श्री.महेश माळवतकर,७.श्री.संतोष जेजुरकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वच मराठा समाजाचा सरसगट ओ.बी.सी.प्रवर्गात समावेश करण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

सभागृहात मोठ्याने बोलणे चालूच होते. याबरोबरच सभा राष्ट्रगिताने संपन्न झाली.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.११.२००८ रोजी आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

**सौ.अनिता घोडेले,स.पालिका सदस्या**

**प्रश्न क्र. ३७ :**

०१. गट नं.१२ पैकी कांचनवाडी पैठणरोड येथील मे.नागपाल प्रोजेक्ट ॲन्ड कन्स्ट्रक्शन यांची बांधकाम परवानगी आयकर सुट विशेष प्रकल्पांतर्गत जी देण्यात आली ती कोणत्या अटी व शर्ती टाकुन देण्यात आली?

**सहाय्यक संचालक,नगर रचना**

**उत्तर :**

गट नंबर १२/पैकी मो.कांचनवाडी येथे परवाना क्र.८५४/२००६-०७ दि.३०.०३.२००७ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी अटी व शर्तीवर देण्यात आली आहे. सदर बांधकाम परवानगी आदेशातील अटी व शर्तीसाठी छायाप्रत सोबत जोडण्यात येत आहे.

०२. अशा प्रकारच्या वि.बां.प.देतांना अटी/शर्ती टाकुन विशेष बां.प.नियमानुसार देता येते काय? कशाच्या आधारे?

**उत्तर :**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार नेहमीच टाकल्या जाणाऱ्या अटी व शर्तीनुसार बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

०३. मुळ रेखांकन /बां.प.चा मुळ नकाशा बदलुन सुधारीत बां.प.देतांना सदरील गट नं.१२च्या मिळकतींवर नगर रचना अधिनियमानुसार असा बदल कशाच्या आधारे करता येतो? या प्रकरणात अशी बां.प.का व कशी बदलण्यात आली?

**उत्तर :**

जमीन मालक /विकासक यांना बांधकाम नियोजनात महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार अनुज्ञेयतेचे मर्यादेत बदल/सुधारणा करता येते. जमीन मालक/ विकासक यांनी सादर केलेली सुधारीत बांधकाम परवानगी प्रस्ताव विहीत नियमानुसार असल्याने मंजूरी देण्यात आली आहे.

०४. सध्या गट नं.१२ पैकी जी बां.प.नियमबाहय दिली जे सध्या बांधकाम सुरू आहे त्याचा अहवाल नगर रचना विभागाने प्राप्त केला आहे काय? तो काय आहे.

**उत्तर :**

गट नं.१२/पै कांचनवाडी येथे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुद व महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली नुसार सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली. जागेवर चालू असलेल्या बांधकामा बाबत तपासणी/नियंत्रण करण्याचे अधिकार प्रशासकीय अधिकारी विभाग/वॉर्ड अधिकारी विभाग यांच्या कार्यकक्षेत येते.

०५. मनपाने दिलेला अनुज्ञेय वापर बदलून किती क्षेत्रामध्ये वापर सुरू आहे?

**उत्तर :**

गट नं.१२/पैकी मौजे कांचनवाडी येथील बांधकाम परवानगीमध्ये निवास उपयोगी वापर अनुज्ञेय केला आहे. सदर ठिकाणी अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) देण्यात आलेले नाही.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद